# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांक:29.06.2025 वार:रविवार

1. अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांचा प्रवास नव्या युगाची सुरुवात असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.
2. कृषी वनीकरणाला चालना देण्यासाठी शेतजमिनीवरील झाडं तोडण्यासंदर्भात आदर्श नियम जारी.
3. संविधान उद्देशिका पार्क आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचं नागपुरात लोकार्पण.
4. पंतप्रधान आज आकाशवाणीवरुन करणार 'मन की बात'.
5. पाच वर्षांखालील बालकांच्या मृत्युदरात भारताने नोंदवली 78 टक्के घट. आणि
6. महिला टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यात , भारताचा इंग्लंडवर पहिल्या सामन्यात 97 धावांनी विजय.

**<u>पंतप्रधान-शुक्ला</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचलेल्या ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्याशी काल संवाद साधला. शुभांशू यांचा प्रवास एका नवीन युगाची सुरुवात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. आपला हा प्रवास संपूर्ण देशासाठी एक सामूहिक कामगिरी असल्याचं सांगून कॅप्टन शुक्ला यांनी भारत अवकाशातून खूप भव्य दिसतो असं निरीक्षण नोंदवलं. विंग कमांडर राकेश शर्मा यांनी 1984 मध्ये सोव्हिएत मोहिमेचा भाग म्हणून अंतराळ प्रवास केल्यानंतर चार दशकांनंतर अंतरिक्षात पोहोचणारे कॅप्टन शुक्ला हे दुसरे भारतीय अंतराळवीर आहेत.

**<u>आचार्य शताब्दी पंतप्रधान</u>**

भारताचं अस्तित्व हजारो वर्षांपासून आपल्या शाश्वत विचारांमुळं, तत्वज्ञानमूळं आणि ज्ञानामूळं अबाधित असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं काल आचार्य विद्यानंदजी महाराज यांच्या शताब्दी समारंभाचं उद्घाटन, पंतप्रधानांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. आचार्य विद्यानंद मुनि हे या प्राचीन भारतीय परंपरेचे आधुनिक दीपस्तंभ असून त्यांनी त्यांचं जीवन केवळ आध्यात्मिक साधनेपूरतचं मर्यादित नं ठेवता समाज आणि संस्कृतीच्या पुनर्बांधणीसाठी एक शक्तिशाली माध्यम बनवलं असे गौरवोदगार यावेळी बोलताना मोदी यांनी काढले.

**<u>झाडं</u>**

कृषी वनीकरणाला चालना देण्यासाठी सरकारनं शेतीच्या जमिनीवरील झाडं तोडण्यासंदर्भात आदर्श नियम जारी केले आहेत. शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करणं, जंगलाबाहेर वृक्षाच्छादन वाढवणं, हवामान बदलाचा प्रभाव आणि लाकडाची आयात कमी करणं तसंच शाश्वत जमिनीचा वापर सुनिश्चित करण्याचा या नियमांचा उद्देश आहे. पर्यावरण मंत्रालयानं सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवून हे आदर्श नियम लागू करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**<u>संविधान पार्क-नागपूर</u>**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जागतिक मूल्य आणि भारतीय शाश्वत मूल्य यांची उत्तम सांगड घालत भारतीय संविधानाची निर्मिती केली असून उद्देशिका हा संविधानाचा गाभा आहे. उद्देशिकेतील मुल्यांचा अंगीकार देशातील नागरिकांनी करावा. त्यामुळ देशातील 90 टक्के प्रश्न कायमचे सुटतील, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपुर इथं केलं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या परिसरात संविधान उद्देशिका उद्यान आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं लोकार्पण सरन्यायाधीश

न्यायमूर्ती भूषण गवई, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री पुढं म्हणाले...

**भारताचं संविधान हे जगातलं सर्वात सुंदर संविधान आहे. हे संविधान तयार करत असताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जागतिक मूल्य आणि शाश्वत भारतीय मूल्य यांची अतिशय उत्तम सांगड घातली आणि भारतीय समाजाला योग्य दिशा मिळेल, या ठिकाणी समतेचं आणि न्यायाचं राज्य स्थापन होईल, सर्वांना संधीचा समान अधिकार असेल आणि कुठेही डिस्क्रेमिनेशन होणार नाही अशा प्रकारचं संविधान हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलं.**

या उद्यानाच्या माध्यमातून संविधानातील मौलिक विचार या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह लोकांपर्यंत पोहोचतील असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला. तत्पूर्वी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात भारताचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्विकारण्याचा आणि त्यानंतर पहिल्याच नागपूर भेटीत संविधान उद्देशिका पार्कच्या उद्घाटनाचा योग आल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

**<u>मन की बात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमात आपले विचार व्यक्त करणार आहेत. मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा 123 वा भाग असेल. हा कार्यक्रम संपूर्ण आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूज ऑन ए आय आर मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. हिंदी प्रसारणानंतर प्रादेशिक भाषांमध्ये हा कार्यक्रम प्रसारित होईल.

**<u>भारत-मृत्युदर</u>**

पाच वर्षांखालील बालकांच्या मृत्युदरात भारतानं 78 टक्के घट नोंदवली आहे, जागतिक स्तरावर ही घट 61 टक्के आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत माझे सहकारी मनोज क्षीरसागर यांच्याकडून...

**संयुक्त राष्ट्रांच्या बाल मृत्युदर अंदाज गट 2024 च्या अहवालानुसार, नवजात बालकांच्या मृत्युदरातही जागतिक स्तरावर 54 टक्क्यांच्या तुलनेत 70 टक्क्यांनी घट झाली आहे. लसीकरण व्याप्ती सुधारण्यावर सतत लक्ष केंद्रित करून, भारतानं वंचित लोकसंख्येपर्यंत पोहोचण्यासाठी सक्रिय आणि समावेशक दृष्टिकोन स्वीकारला असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. लसीकरण हा एक सर्वात शक्तिशाली आणि परवडणारा सार्वजनिक आरोग्य उपाय आहे. भारतात सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाद्वारे दरवर्षी 2 कोटी 90 लाख गर्भवती महिला आणि 2 कोटी 60 लाख बालकांना मोफत लसीकरण केलं जातं. जीवरक्षक लसींच्या वाढलेल्या संख्येमुळं अतिसार, न्यूमोनिया, मेंदूज्वर आणि एन्सेफलायटीसमुळे मुलांमधील मृत्यू आणि विकृती कमी करण्यासाठी झालेला परिणामही स्पष्टपणे दिसून येत आहे. लसीकरण मोहिमेच्या निरंतर अंमलबजावणीमुळं, भारतातील एकंदर लोकसंख्येतील शून्य मात्रा म्हणजे एकही लस न दिलेल्या बालकांचं प्रमाण 2023 मधील 11 शतांश टक्क्यांवरून 2024 मध्ये 6 शतांश टक्क्यांपर्यंत कमी झालं आहे. बाल आरोग्याचं हे जगासाठी चांगलं उदाहरण असल्याचं संयुक्त राष्ट्रसंघाच्या बालआरोग्य विषयक समितीच्या अहवालात म्हटलं आहे. राष्ट्रीय लसीकरण दिवसाद्वारे भारतानं 2014 पासून पोलिओमुक्त देश हा दर्जा टिकवला आहे.**

**<u>धरती आबा</u>**

आदिवासी जमातीच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाकरीता प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान, पुणे जिल्ह्यात प्रभावीपणे राबवून पुणे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्याकरीता प्रयत्न करण्याच्या सूचना आदिवासी विकास विभागाचे मंत्री अशोक वुईके यांनी काल पुण्यात दिल्या. या संदर्भात आयोजित केलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

**कृषी संकल्प**

परभणी जिल्ह्यात 15 दिवस राबवण्यात आलेल्या कृषी संकल्प अभियानातर्गत 90 गावांमध्ये कृषी विज्ञान केंद्राच्या आणि कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नवीन तंत्रज्ञानाचं मार्गदर्शन केलं. खरीपाच्या पेरणीमध्ये शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत होऊन उत्पन्नात वाढ होईल अशी अपेक्षा कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉक्टर प्रशांत भोसले यांनी व्यक्त केली.

**आंबा बैठक**

बँकेचे शाखाधिकारी शेतकऱ्यांकडे कर्जासाठी सिबिल स्कोअरची मागणी करत असतील, तर अशा शाखाधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा, असे निर्देश रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी काल दिले. जिल्ह्यातल्या आंबा बागायतदारांच्या अडचणींसंदर्भात काल जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

**जपानी-बीड**

जपानमधील Cosmo India कंपनी आणि बीड जिल्ह्यातील स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या तीनं ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी जपानी भाषा शिक्षण केंद्राचं उद्घाटन कंपनीचे मालक होदो रयोतो यांच्या हस्ते काल करण्यात आले. या केंद्रात आंतरसंवादी माध्यमातून जपानमधील शिक्षक दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकवणार आहेत.

**लोकार्पण-कोल्हापूर**

कोल्हापूर चित्रनगरीमधील 44 कोटींच्या चित्रीकरण स्थळांचं लोकार्पण आणि भूमिपूजन सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते काल करण्यात आलं. निर्मिती पश्चात कार्यासाठी आवश्यक दुमजली इमारतीचं भूमीपूजनही करण्यात आलं. उच्च दर्जाच्या तंत्रज्ञानासह एफ टी आय आय मार्फत चित्रपट शिक्षण इथं देण्यात येणार आहे.

**संमेलन-सांगली**

पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशाकार बाबा भारती यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुण्याच्या लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्यावतीनं पहिलं पाली-मराठी साहित्य संमेलन सांगली जिल्ह्यात आष्टा इथं काल मोठ्या उत्साहात पार पडलं.

**दरबार**

जुन्या पिढीतील नामवंत सॅक्सोफोन वादक इकबाल दरबार यांचं काल  पुण्यात निधन झालं ते 77 वर्षांचे होते. त्यांच्या सॅक्सोफोन वादनाचं कौशल्य सर्वदूर पसरलेलं होतं. त्यांनी स्थापन केलेल्या 'मोहम्मद रफी आर्ट फाउंडेशन'च्या माध्यमातून गरजू कलाकारांना वैद्यकीय आणि आर्थिक सहाय्य करण्यासाठी प्रयत्न केले.

**क्रिकेट**

महिलांच्या टी-ट्वेंटी मालिकेत पाचपैकी पहिल्या सामन्यात भारतानं काल इंग्लंडचा 97 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित 20 षटकांत 5 बाद 210 धावा केल्या. स्मृती मानधनानं 62 चेंडूत 112 धावा करत टी-20 मधील आपलं पहिलं शतक साकारले. इंग्लंडचा संघ पंधराव्या षटकांत 113 धावांवर बाद झाला. भारताच्या श्री चरणीनं 4 बळी घेतले. स्मृती मानधनाला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**